MHGO050006352022

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | – | ०४–११–२०२२ |
| नोंदणी तारीख | – | ०४–११–२०२२ |
| निकाल तारीख | – | २४–०८–२०२३ |
| कालावधी | – | ०० वर्ष ०९ म. २० दि. |

**न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, सडक अर्जुनी यांचे न्यायालय**
( पीठासीन अधिकारी श्री. डॉ. विक्रम अं. आव्हाड )

**संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ३३०/२०२२** **निशाणी क्र. १४**

महाराष्ट्र शासनमार्फत,
पोलीस स्टेशन अधिकारी,
पोलीस स्टेशन, डुग्गीपार. ... **अभियोग पक्ष**

*...विरूध्द...*

हरिचंद मोडकु बन्सोड,
वय ६७ वर्षे, धंदा – मजुरी,
रा. सावंगी, ता. सडक अर्जुनी,
जि. गोंदिया. ... **आरोपी**

**महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(ई), ७७(अ) *अन्वये दंडनिय अपराध***

---

| | | |
|---|---|---|
| विशेष सहा. सरकारी अभियोक्ता | : | श्री. ओ. एस. गहाने |
| आरोपीचे अधिवक्ता | : | श्री. ए. एस. राउत |

---

## *न्यायनिर्णय*
## *(पारित दिनांक २४ ऑगस्ट २०२३)*

आरोपीविरूध्द महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(ई), ७७(अ) अंतर्गत शिक्षेस पात्र असलेल्या अपराधासाठी अभियोग चालविण्यात आला.

२. अभियोग पक्षाचे प्रकरण थोडक्यात पुढील प्रमाणे मांडता येईल,

दिनांक १२.१०.२०२२ रोजी सायंकाळी ०६:३० ते ०७:१५ वाजताच्या सुमारास मौजा सावंगी, ता. सडक अर्जुनी, जि. गोंदिया येथे आरोपीच्या घराची झडती घेतली असता आरोपी हा त्याच्या घराच्या माजघरात एका प्लास्टीक थैल्यात प्रत्येकी ९० मिली देशी दारू असलेल्या १३ बाटल्या किंमत रूपये ४५५/— विना पास व परवाना बेकायदेशीररित्या कब्जात बाळगतांना मिळुन आला. अशा आशयाची फिर्याद पोलीस नाईक घनश्याम मुळे, ब. नं. १७०९ यांनी आरोपीविरुध्द पोलीस स्टेशन डुग्गीपार येथे दाखल केली.

३. सदर फिर्यादीच्या आधारे पोलीस स्टेशन डुग्गीपार येथे आरोपीविरूध्द अपराध क्र. २३२/२०२२ दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पोलीस हवालदार हरिश्चंद शेंडे, ब. नं. ५२९ यांनी केला. पोलीस नाईक घनश्याम मुळे यांनी जप्ती पंचनामा तयार केला. पोलीस हवालदार हरिश्चंद शेंडे यांनी आरोपीला हजर राहण्याबाबत फौजदारी प्रक्रिया संहीता कलम ४१(१)(अ) अन्वये नोटीस दिले व तपासाअंती आरोपीविरूध्द गुन्हा सिध्द होण्याइतपत सबळ पुरावा मिळुन आल्याने न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

४. सदर प्रकरणात आरोपीविरुध्द निशाणी क्र. ०८ वर दोषारोप निश्चित केले. त्यामधील मजकूर आरोपीला वाचून व समजावून सांगण्यात आला. तो आरोपीने कबुल नसल्याचे सांगुन प्रकरण पुढे चालविण्याची विनंती केली. आरोपींविरुध्द सबळ पुरावा अभिलेखावर नसल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३(१)(ब) अन्वये निवेदन नोंदविण्यात आले नाही.

५. खटल्यातील वास्तविकता व परिस्थितीवरून माझ्या समोर निश्चयार्थ पुढील मुद्दे उपस्थित झाले आहेत. त्यावर मी माझे निष्कर्ष त्याखाली दिलेल्या कारणमिमांसे आधारे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दा** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१)** | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, दिनांक १२.१०. २०२२ रोजी सायंकाळी ०६:३० ते ०७:१५ वाजताच्या सुमारास मौजा सावंगी, ता. सडक अर्जुनी, जि. गोंदिया येथे आरोपीच्या घराच्या माजघरात एका प्लास्टीक थैल्यात प्रत्येकी ९० मिली देशी दारू असलेल्या १३ बाटल्या किंमत रूपये ४५५/— असा मुद्देमाल अवैधरित्या व विनापरवाना मिळुन आला आणि त्याद्वारे आरोपीने महाराष्ट्र दारूबंदी कायद्याचे | **नकारार्थी.** |

उल्लंघन केले?

२) आदेश काय? **आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते.**

## <u>कारणमिमांसा</u>

***<u>मुद्दा क्र. १ करीता</u> :—***

**६.** आरोपी विरुध्द दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षास पुढील बाबी पुराव्यानिशी व संशयाच्यापलीकडे जावुन सिध्द करणे गरजेचे आहे.

अ. आरोपी हा अवैधरित्या मादक द्रव्य बाळगतांना मिळून आला.
ब. आरोपी जवळचे मादक द्रव्य विना परवाना होते.

**७.** अभियोग पक्षातर्फे आरोपीविरूध्द असलेले दोषारोप सिध्द करण्याकामी एकुण दोन साक्षीदार तपासण्यात आले. साक्षीदार क्र. १ नामे अतिथ धुर्वा बन्सोड, पंच निशाणी क्र. १० व साक्षीदार क्र. २ नामे हरिष मुक्तेश्वर बन्सोड, पंच निशाणी क्र. १२ यांना तपासण्यात आले.

**८.** अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदाराच्या पुराव्यानंतर निशाणी क्र. १ वरील आदेशाप्रमाणे अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

**९.** अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र. १ या पंच साक्षीदाराने आपल्या साक्ष पुराव्यात असे कथन केले की ते आरोपीस ओळखत असुन साधारण २ ते ३ महिण्यापुर्वी ते सावंगी गावात कामासाठी जात असतांना सावंगी गावातील बोरवेल जवळ पोलीसांनी त्यांना बोलाविले व त्यांची चौकशी करून त्यांचे नाव गाव विचारले आणि एका कागदावर सही करण्यास सांगितले. पोलीसांच्या सांगण्यावरून ते त्या कागदावर सही केली. त्यांना तो कागद दाखविण्यात आला त्यावर असलेली सही ही त्यांची आहे. त्या कागदात काय लिहीले आहे हे त्यांना सांगता येणार नाही कारण त्यांनी तो कागद वाचला नव्हता. जप्ती पंचनाम्यावर त्यांची सही असल्याचे त्यांनी मान्य केले. परंतु, त्यातील मजकुराबाबत पुर्णत: अनभिज्ञता दर्शविली. साक्षीदार क्र.२ हे देखील पंच साक्षीदार असुन त्यांनी त्यांच्या साक्षीपुराव्यात असे कथन केले की ते आरोपीस ओळखत नाही. साधारण १ वर्षापुर्वी ते शेतीतुन सावंगी गावात येत असतांना पोलीसांनी त्यांना बोलाविले व त्यांची चौकशी करून त्यांचे नाव गाव विचारले, आणि एका कागदावर सही करण्यास सांगितले. पोलीसांच्या सांगण्यावरून त्यांनी त्या कागदावर सही केली. त्यांना तो

कागद दाखविण्यात आला त्यावर असलेली सही ही त्यांची आहे. त्या कागदात काय लिहीले आहे हे त्यांना सांगता येणार नाही कारण त्यांनी तो कागद वाचला नव्हता. जप्ती पंचनाम्यावर त्यांची सही असल्याचे त्यांनी मान्य केले. परंतु, त्यातील मजकुराबाबत पुर्णत: अनभिज्ञता दर्शविली. सदर दोन्ही पंच साक्षीदारांनी अभियोग पक्षाला दुजोरा दिला नाही. त्यांनी अभियोग पक्षाला सहाय्य न केल्यामुळे जप्ती पंचनामा सिध्द झाला नाही. त्यामुळे जप्त मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातून प्राप्त झाला ही महत्वाची बाब अभियोग पक्षाला सिध्द करता आली नाही.

**१०.** आरोपीकडून कथित जप्त करण्यात आलेले द्रव्य मुद्देमाल ही देशी दारू होती हे सिध्द करण्याकरिता अभियोग पक्षाने रासायनिक विश्लेषणाचा अहवाल सदर प्रकरणात दाखल केला आहे. परंतु पुरेशी संधी देवुनही अभियोग पक्षाने सदर अहवाल देणा—या अधिका—याची तसेच फिर्यादी व तपासी अधिकारी यांची साक्ष नोंदविली नाही. तसेच अभिलेखावरील रासायनिक विश्लेषनाचे अहवालाचे बारकाईने अवलोकन केले असता असे दिसुन येते की, त्यांना पत्र क्र. २४७३/२०२२, दि. ०७.११. २०२२ रोजी नमुना हा रासायनिक विश्लेषणाकामी न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळा धंतोली, नागपुर येथे पाठविल्याचे दिसुन येत आहे. परंतु पोलीस स्टेशन, डुग्गीपार यांनी रासायनिक अहवालाकरिता पाठविण्यात आलेले पत्रामध्ये जावक्र क्रंमाक व तारीख दिसुन येत नाही. तसेच गुन्हा दिनांक १२.१०. २०२२ रोजी दाखल केला असुन रासायनिक विश्लेषण अहवालाकरीता सदर सिलबंद केलेली बाटली दिनांक ०७.११.२०२२ रोजी रासायनिक विश्लेषण अहवाल मिळण्याकामी न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळा धंतोली, नागपुर यांच्याकडे पाठविली आहे. याचाच अर्थ असा की साधारण २६ दिवसानंतर सदर सिलबंद बाटली ही रासायनिक विश्लेषणाकामी पाठविण्यात आलेली आहे. सदर सिलबंद बाटलीमध्ये २६ दिवसात काही छेडछाड केली नाही याबाबत कुठलाही पुरावा अभिलेखावर नोंदविण्यात आलेला नाही. अशा उक्त परिस्थितीत रासायनिक विश्लेषण अहवालावर विश्वास ठेवुन आरोपीला दोषी ठरविने कायद्याने अभिप्रेत नाही. अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र. १ व २ यांनी अभियोग पक्षाला दुजोरा न दिल्यामुळे अभियोगपक्षाचे खटल्याला बळकटी येण्यासाठी खात्रीदायक सबळ पुरावा अभिलेखावर आलेला नाही. अभियोग पक्ष सबळ पुराव्या अभावी आरोपी विरूध्द गुन्हा संशयाच्या पलीकडे जावून सिध्द करू शकले नाही. वरील कारणावरून आरोपी हा संशयाचा फायदा घेण्यास पात्र आहे.

**११.** उपरोक्त चर्चेचा सारासार विचार करता आरोपीविरूध्द अभियोग पक्षाद्वारे काहीही शाबीत झालेले नाही आणि निश्चयार्थ मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष ठरविताना माझ्या मनात कोणताही वहम नाही.

वरील सर्व बाबींच्या उहापोहानंतर मी या निष्कर्षावर पोहचलो आहे की, महाराष्ट्र दारूबंदी कायद्याअंतर्गत कलम ६५(ई) व ७७(अ) नुसार शिक्षापात्र गुन्हा आरोपीविरूध्द अभियोग पक्ष ठोस पुराव्या अभावी सिध्द करू शकले नाही. कलम ६५(ई) व ७७(अ) निश्चयार्थ **मुद्दा क्र. १** चा निष्कर्ष **नकारार्थी** ठरविण्यात आला आहे.

**१२.** उपरोक्त संपूर्ण घटनांचा सारासार विचार करता, निश्चयार्थ **मुद्दा क्र. २** च्या अनुषंगाने मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**१)** आरोपी यांची फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८(१) अन्वये महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५(ई) व ७७(अ) नुसार शिक्षापात्र असलेल्या गुन्हयाच्या दोषारोपातुन **निर्दोष मुक्तता** करण्यात येते.

**२)** आरोपीने दिलेली जमानत व बंधपत्र रद्द करण्यात येते व त्यांना मुक्त करण्यात येते.

**३)** आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७–अ च्या पुर्ततेकरिता रू. १५,०००/– ची जमानत व बंधपत्र सात दिवसांच्या आत दाखल करावे.

**४)** जप्त मुद्देमाल प्रत्येकी ९० मिली देशी दारू असलेल्या १३ बाटल्या अपील कालावधीनंतर आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क विभाग, गोंदिया यांच्याकडे योग्य ती विल्हेवाट लावण्याकरीता पाठविण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात **फौ.प्र.सं. कलम ३५३(१)** अन्वये अधिघोषित करण्यात आला)

Digitally signed by VIKRAM AMBADAS AVHAD
Date: 2023.08.24 17:43:11 +0530

**सडक अर्जुनी**
**दिनांक : २४.०८.२०२३**

**(डॉ. विक्रम अं. आव्हाड)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
**सडक अर्जुनी.**

मी प्रमाणीत करतो की, या पीडीएफ फाईलमधील मजकुर व मुळ न्यायनिर्णय मधील मजकुर हा एकसारखाच आहे.

लघुलेखकाचे नाव : आर. डी. भुजाडे
कोर्टाचे नाव : डॉ. वि. अं. आव्हाड,
दिवाणी न्यायाधीश क. स्तर
व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, सडक अर्जुनी

न्यायनिर्णय/आदेश दिनांक : २४.०८.२०२३
पिठासीन अधिकारी यांनी सही केलेली तारीख : २४.०८.२०२३
न्यायनिर्णय/आदेश अपलोड केलेली तारीख : २४.०८.२०२३